**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
IN COLLABORATION WITH
**INDO GERMAN TOOL ROOM, AURANGABAD**
**EXTENSION CENTRE**

# "ADVANCED TECHNOLOGY CENTRE"

(A Centre for Training, Research and Development)

Estd: 1962
NAAC 'A' Grade

## ADMISSION NOTICE

Applications are invited in the prescribed format for admission into the following full time NSQF Level 6 compliant Medium Term Courses (MTC) & Short Term Courses (STC) at Advanced Technology Centre, Shivaji University Campus, Kolhapur.

| Sr. No | Course | Duration | Reg. Fees | Course Fees | Other Fees |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Master Certificate Course in CAD/CAM | 6 Months Per Course | Rs.600/- Per Course | Rs.40000/- | Rs 3000/- (Security Deposit) per Course |
| 2 | Master Certificate Course in Tool Design | | | Rs.40000/- | |
| 3 | Master Certificate Course in Computer Aided Tool Engineering | | | Rs.40000/- | |
| 4 | Advance Diploma in Structural Design & Analysis | | | Rs.40000/- | |
| 5 | Adv. Diploma in Comp. Hardware and Network Management | | | Rs.25000/- | |
| 6 | CISCO Certified Network Associate (CCNA) | 4 Months | | Rs.20000/- | |
| 7 | AutoCAD | (STC) 96 Hrs. Per Course | Rs.300/- Per Course | Rs.4500/- | 18% GST Extra on Registration Fee & Course Fee Per Course |
| 8 | SolidWorks | | | Rs.5500/- | |
| 9 | Creo Parametric (Pro-E) | | | Rs.8000/- | |
| 10 | CATIA | | | Rs.8000/- | |
| 11 | Unigraphics | | | Rs.11000/- | |
| 12 | Ansys | | | Rs.9000/- | |
| 13 | Hypermesh | | | Rs. 9000/- | |
| 14 | CNC Programming | | | Rs.6500/- | |
| 15 | Revit Architecture | | | Rs.9000/- | |
| 16 | 3DS Max | | | Rs.9000/- | |
| 17 | PLC Programming | | | Rs.8000/- | |
| 18 | SCADA | | | Rs.8000/- | |
| 19 | VLSI | | | Rs.8000/- | |
| 20 | Embedded Systems | | | Rs.8000/- | |

**Eligibility**: For Sr.1 to 3, 7 to 14 - Degree / Diploma in Engineering (Mech. / Prod. / Auto. or Equivalent) – Pass or Appearing
: For Sr.4, 15 to 16 - Degree / Diploma in Engineering (Civil / Architecture or Equivalent) - Pass or Appearing
: For Sr. 5 & 6 - Any Graduate/Diploma - Pass or Appearing
: For 17 to 20 - Degree/Diploma in Engg. Elec./Electronics/ Mech./ Prod./ Auto. / Aero. or Equivalent - Pursuing or Pass

- **For Courses Sr. No. 1 to 6 Commencement of New Batch for Courses on: First Monday of Every Month**
- **For Courses Sr. No. 7 to 20 Commencement of New Batch for Courses on: First Monday of Every Week**
- **22.5% seats are reserved for SC/ST candidates for whom no tuition fee will be charged subject to production of authentic Caste certificate**
- Registrations for the above courses are under progress, contact ATC for more information or download the registration forms from the website below. Submit the form at ATC.

**Address:** Advanced Technology Centre, 2nd Floor Geography Dept. Shivaji University, Kolhapur.
**For more details, visit our website:** - www.igtr-aur.gov.in, www.unishivaji.ac.in
**Contact: 0231-2692383, 9404124929, 9168224948, 8624865696, 8007288248, 9665042933, 0231-2609063**
**Coordinator - Dr. Ajit B. Kolekar**

**Place: Kolhapur**

**Dr. Vilas D. Nandavadekar**
Registrar
Shivaji University, Kolhapur

# समाजशास्त्र परिषदेच्या संकेतस्थळाचे उद्‌घाटन

## डिसेंबरमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद; २५ देशांचे समाजशास्त्रज्ञ उपस्थित राहणार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी स्वतंत्र वेबसाईट निर्माण करून त्याद्वारे नोंदणी करण्याचा समाजशास्त्र अधिविभागाचा उपक्रम अत्यंत स्तुत्य स्वरूपाचा आहे. यातून विद्यापीठाबरोबरच अधिविभागाची जगभरातील समाजशास्त्रज्ञांमध्ये उत्तम प्रतिमा निर्मिती होईल, असा विश्वास प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागामार्फत दि. १० ते १२ डिसेंबर २०१९ या कालावधीत 'सोसायटी : रिकन्स्ट्रक्शन, रिफ्लेक्शन अँड रिस्पॉन्सिबिलिटीज' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेच्या नोंदणीसाठी 'एसआरआरआर डॉट इन' या विशेष संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेतस्थळाचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात या संकेतस्थळाच्या लाँचिंगचा औपचारिक कार्यक्रम झाला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'एसआरआरआर डॉट इन' या विशेष संकेतस्थळाच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. भारती पाटील, डॉ. जगन करांडे.**

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून समाजशास्त्र विषयातील जागतिक स्तरावरील विचारवंत, प्रज्ञावंत, शास्त्रज्ञ, अभ्यासक यांच्यात विचारांचे आदान-प्रदान होणार आहे. स्थानिक संशोधकांना या परिषदेचा मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनीही विशेष वेबसाईट निर्मितीच्या उपक्रमाचे स्वागत केले.

कोल्हापूर येथील 'मीडियाटेक'च्या वतीने या वेबसाईटची निर्मिती केली आहे. समाजशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी सुमारे २५ देशांतील समाजशास्त्रज्ञ व विचारवंत उपस्थित राहतील, असे समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविकात सांगितले. डॉ. प्रतिमा पवार यांनी आभार मानले. डॉ. आर. बी. पाटील, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. के. व्ही. मारुलकर, डॉ. एच. एम. ठकार, डॉ. व्ही. बी. ककडे, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. पी. एम. माने आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात पी. जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस कोर्ससाठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए अधिविभागामध्ये पी.जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस या एक वर्ष कालावधीमधील डिप्लोमा कोर्ससाठी शैक्षणिक वर्ष २०१९ -२०२० ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. दि.१० जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज करता येणार आहेत.

पी.जी. डिप्लोमा इन ई-बिझनेस या कोर्सला कोणत्याही विषयाचे पदवीधारक विद्यार्थी, नोकरदार वर्ग, व्यावसाईक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात. कोर्सच्या अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन एम. बी. ए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

My Kolhapur Edition
7 July, 2019 Page No. 4
Powered by : erelego.com

# पी.जी. डिप्लोमा इन इ-बिझनेस कोर्ससाठी प्रवेश

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागामध्ये 'पी. जी. डिप्लोमा इन इ-बिझनेस' हा एक वर्षाचा डिप्लोमा अभ्यासक्रम गेल्या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात आला आहे.

या वर्षीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या ॲनेक्स इमारतीमधून अर्ज घेऊन दि. १० जुलैपर्यंत प्रवेश अर्ज भरावयाचे आहेत. 'पी. जी. डिप्लोमा इन इ-बिझनेस' या अभ्यासक्रमाला कोणत्याही विषयाचे पदवीधारक विद्यार्थी, नोकरदार वर्ग, व्यावसायिक या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेऊ शकतात.

या कोर्सच्या अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी एमबीए अधिविभागात संपर्क साधावा अथवा विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन एमबीए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.